



Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे    अंक : ७७०. वा    सोमवार    दि. १३ मे २०२४    पृष्ठ ८    किंमत ३रुपये


# ...खरेदीतील अनियमिततेची चौकशी...

## जिल्हा रुग्णालय करोडो रुपये भ्रष्टाचार प्रकरणात राज्याचे अवर सचिवांकडून पाच सदस्य समिती गठित

जनसंचलन/बुलढाणा

**बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालयाला आलेला करोडो रुपयांचा विविध निधी व त्यातून कागदोपत्री दाखविण्यात आलेली साहित्यांची वर्क ऑर्डर प्रमाणे खरेदीचा बहुचर्चित उलगडा ऑन केमेरा पंचा समोर करण्याची मुख्य सचिव यांच्याकडे तक्रारकर्त्याची मागणी जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, बुलडाणा व त्यांचे अधिनस्त असलेल्या कार्यालयामधील उपकरणे व साहित्य खरेदी प्रक्रियेतील आर्थिक अनियमित्ता तसेच लेखा-परीक्षणातील मुद्द्यांची पूर्तता होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाचे अव्वर सचिव चंद्रकांत वडे यांनी नुकतेच एका पत्राद्वारे चौकशीचे आदेश दिले आहे. दरम्यान विविध विभागातील पाच प्रमुख अधिकारी यांची समिती गठित करण्यात आली आहे, सदर समिती बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात करोडो रुपये खरेदीतील अनियमितता संदर्भात चौकशी करून शासनाकडे ३० दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश अवर सचिव यांनी दिले आहे.**

महाराष्ट्र शासन युवा सामाजिक पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते खरात यांनी बुलडाणा जिल्हा शल्य चिकित्सक यांच्यामार्फत त्यांच्या अधिनस्त असलेल्या जिल्हा सामान्य रुग्णालयात विविध उपकरणे व साहित्य

**पोस्टमार्टम ८२**

खरेदी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याबद्दल तक्रार नोंदविली होती. सदर अनेक तक्रारीच्या अनुषंगाने खरात व सिटी न्यूज टीम यांनी सातत्याने चिकित्सक जिल्हा सामान्य रुग्णालय बुलडाणा या कार्यालयाचे लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त अधिनियम १९७३ चे कलम (१२) ३ मधील तरतुदीनुसार प्रस्तुत चौकशी ही विशेष तपास समितीकडून करण्याचे निर्देश पोलीस महासंचालक मुंबई यांना देण्यात यावे अशी आग्रही मागणी सिटी न्यूज व खरात यांनी लोक आयुक्त प्रशासन भवन मंत्रालय मुंबई यांच्याकडे काही दिवस अगोदर एका पत्राद्वारे केली होती. नुकतेच महाराष्ट्र राज्याचे अवर सचिव चंद्रकांत वडे यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे रुग्णालयातील उपकरणे व इतर साहित्य खरेदीत झालेल्या अनियमितते बाबत चौकशी करण्यासाठी पाच सदस्य समिती गठित केली. याबरोबरच आयुक्त आरोग्यसेवा आयुक्तालयाने चौकशी समितीच्या चौकशी अहवालाच्या आधारे सदरहू गंभीर अनियमितेस जबाबदार असलेल्या संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक

### चौकशी समितीमध्ये यांचा सहभाग

**यामध्ये शहरी आरोग्य उपसंचालक आरोग्य सेवा मुंबईचे डॉ. संजीवकुमार जाधव यांची समिती अध्यक्ष म्हणुन नियुक्ती केली. तर इतर सदस्यांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूरचे कार्यकारी अभियंता, उपसंचालक आरोग्य सेवा अकोलाचे अभियंता, प्रशासकीय अधिकारी जिल्हा सामान्य रुग्णालय पालघरचे भाऊ सिन्नलकर, वनितीन काकडे लेखाधिकारी व भंडार पडताळणी अधिकारी कुटुंब कल्याण पुणे यांचा सदर चौकशी समितीत समावेश आहे. राज्य अवर सचिव यांनी दिलेल्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या पाच सदस्य समितीला सदर प्रकरणात सखोल चौकशी करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल कोणत्याही परिस्थितीत ३० दिवसाच्या आत शासनास तसेच आयुक्तालयात सादर करावयाचे आहे.**

सामान्य रुग्णालय बुलढाणा व मुख्य प्रशासकीय अधिकारी तसेच इतर कर्मचाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा १९७१ मधील नियम १२ नुसार आयुक्त विभागीय चौकशीचा प्रस्ताव पुढील १५ दिवसात सादर करण्याचे आदेश दिले आहे. शासनाने नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालानंतर जिल्हा शल्य चिकित्सक व इतर कर्मचाऱ्यावर होणाऱ्या कारवाईकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात दोषी असलेले अधिकारी व काही कर्मचारी स्वयंघोषित राजकीय




दबाव व राजकीय लोकांशी असलेले नाते समोर करून आरोग्य विभागात स्वतः ची दादागिरी करून कित्येकांना वेठीस धरले आहे.जिल्हा सामान्य रुग्णालय एक परंतु भ्रष्टचाराच्या भानगडी अनेक भ्रष्टाचारातून कमावलेली चल / अचल संपत्ती हे सर्व काही पुरावे तक्रारकर्ते यांच्या कडे चित्रफीत असून ते योग्य वेळेनुसार संबंधिताकडे देण्याचे बोलले जात आहे. **अबब काय होतास तू काय झालास तू ..!** या भ्रष्टाचारातून दोषींनी जमवलेली संपत्तीचा त्यांची पूर्व परिस्थिती आजची परिस्थिचा पूर्ण हिशेब प्रशासनासमोर तक्रारकर्ता पुराव्यानिशी मांडणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

## १ जूनपासून पशुधनाच्या कानाला बिल्ला नसल्यास नुकसानभरपाई मिळणार नाही!

जनसंचलन/बुलढाणा

गाय, म्हैस, शेळी व मेंढी व इतर पशुधनास बिल्ला मारून घेणे (टॅगिंग) बंधनकारक करण्यात आले असून, येत्या १ जूनपासून त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. कानातील बिल्ल्याशिवाय पशुधनाची खरेदी-विक्री करता येणार नाही. त्यामुळे पशुपालकांना पशुधनास कानात बिल्ला मारून घेणे बंधनकारक झाले आहे. सर्व शेतकरी, पशुपालकांकडे असलेल्या प्रत्येक लहान-मोठ्या पशुधनास कानात बिल्ला असणे शासनाने बंधनकारक केलेले आहे. कानातील बिल्ल्याशिवाय पशुधनास दवाखान्यामधून पशुवैद्यकीय सेवा विजेचा धक्का, वन्यपशुंच्या हल्ल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या पशुधनास कानाला बिल्ला नसल्यास नुकसान भरपाईची रक्कम देय होणार नाही. तसेच पशु विभाागाकडून सवलती नसलेल्या पशुधनाची बाजार समिती, आठवडी बाजार व गावागावांतील खरेदी-विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. बिल्ला नसलेले पशुधन बाजार समितीमध्ये आणले जाणार नाहीत. त्यांची खरेदी-विक्री होणार नाही. याची दक्षता संबंधित बाजार



समितीद्वारे घेण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास होऊ शकतो.पशुंच्या कानात बिल्ला असल्याशिवाय वाहतूक करता येणार नाही. तसे केल्यास पशुधनाचे मालक व वाहतूकदारांवर कारवाई करण्यात येणार आहे. पशुधनाच्या विक्री संदर्भातही त्यामुळे अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे बिल्ला गरजेचा

## अपघातात जीवे मारण्याचा प्रयत्न आरोपी विरुध्द गुन्हा दाखल

जनसंचलन/मेरा बु

जुन्या भांडणाच्या करणावरुण जीवे मारण्याच्या उद्देशाने आरोपीने स्वतः जवळील महिंद्रा गाडीची चालत्या मोटार सायकलला पाठीमागून जोरदार धडक दिली आणि गंभीर जखमी केले. अंढेरा पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार अंढेरा येथील प्रविण रामप्रसाद तेजनकर वय २४ वर्ष हे काका विजय तेजनकर यांच्या मो. सा. क्र एम एच २८ एए १४३३ ने बाहेर गावी जाण्यासाठी फाट्याकडे जात असतांना विकास देविदास नागरे यांनी जुन्या वादावरून जिवेठार मारण्याच्या उददेशाने महींद्रा बोलेरो क्र एम एच ३० बीडी ३५४५ या वाहनाने पाठीमागून जोराने मोटार




सायकलला धडक दिली. त्यामध्ये मोटार सायकल वरुण विजय तेजनकर आणि प्रवीण तेजनकर दोघेही रोडवर पडून गंभीर जखमी झाले.अशा तक्रारी वरुन अंढेरा ठाणेदार विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय गणेश देढे यांनी आरोपी विकास देविदास नागरे यांच्या विरुध्द कलम ३०७ भादवीप्रमाणे गुन्हा दाखल केला असून तपास दुय्यम ठाणेदार सुरेश जारवाल यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अनुदान नाही म्हणत दागिने केले लंपास



**जनसंचलन/ खामगाव**

अंगावर सोन्याचे दागिने असल्याने अनुदान मिळणार नाही. त्यामुळे दागिने काढून ठेवण्याची बतावणी करीत एका महिलेचे ३१ हजार रुपयांचे दागिने लंपास करण्यात आले. ही घटना गुरुवारी केडिया टर्निंगजवळ घडली. याबाबत उर्मिला यशवंत बोडखे (५०, रा. चांदमारी) यांनी शहर पोलिस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार, गुरुवारी आठवडी बाजार करून त्या घरी परतत होत्या. दरम्यान, केडिया टर्निंगजवळील अर्जुन जलमंदिराजवळ त्यांना एक अनोळखी इसम भेटला. त्याने अंगावर सोन्याचे दागिने असल्याने अनुदान मिळणार नाही अशी बतावणी करीत सोन्याची १६ हजार रुपयांची पोत आणि १५ हजार रुपये किमतीचे कानातले असे ३१ हजार रुपयांचे दागिने लंपास केले.

# शिवसेना उबाठा नेते संजय राऊत यांच्या बेजबाबदार वक्तव्याचा बुलडाणा भाजपाने निवेदन देऊन व्यक्त केला निषेध!

**जनसंचलन/बुलढाणा**




शिवसेना उबाठा गटाचे बोलघेवडे नेते संजय राऊत यांनी आपल्या देशाचे लोकप्रिय प्रधानमंत्री शिवभक्त श्री.नरेंद्रजी मोदी यांची तुलना औरंगजेबासोबत करुन त्यांना महाराष्ट्रात गाडण्याची भाषा केली आहे. या बेजबाबदार वक्तव्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी भाजपा युवा मोर्चाच्या वतीने संपुर्ण महाराष्ट्रात ठिकठिकाणी निषेध आंदोलन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून बुलडाणा मुख्यालयी भाजपाच्या वतीने निषेध व्यक्त करण्यासाठी आदर्श आचार संहिता सुरु असल्याकारणाने बुलडाणा तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने उग्र आंदोलन न करता प्रतिनिधी मंडळामार्फत जिल्हा प्रशासनाला निवेदन देऊन तीव्र शब्दात निषेध व्यक्त करण्यात आला. मा.जिल्हाधिकारी यांना दिलेले निवेदन असे की, शिवसेना उबाठा नेते संजय राऊत यांनी पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांची तुलना औरंगजेबासोबत केली असून त्यांना महाराष्ट्रात गाडण्याची भाषा केली आहे. या वक्तव्याचा बुलढाणा तालुका भारतीय जनता पार्टी व युवा मोर्चाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत आहे. आदर्श आचारसंहिता सुरू असल्याकारणाने आम्ही भारतीय जनता पार्टीच्या वतीने प्रतिनिधी मंडळामार्फत आपल्याकडे निवेदन देऊन तीव्र शब्दात निषेध व्यक्त करीत आहोत तरी संजय राऊत यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी प्रशासनाला आपल्यामार्फत विनंती करण्यात येत आहे. असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर निवेदन देताना सौ.स्मिताताई चेकेटकर जिल्हाध्यक्ष महिला मोर्चा, मंदार बाहेकर जिल्हा सरचिटणीस किसान मोर्चा, योगेश राजपूत विधानसभा संयोजक युवा मोर्चा, सतिश भाकरे पाटील तालुकाध्यक्ष भाजपा युवा मोर्चा, सतिश देहाडराय भाजपा तालुका सरचिटणीस, अभिषेक वायकोस चिखली विधानसभा संयोजक जैन प्रकोष्ट यांच्या प्रतिनिधी मंडळाची उपस्थिती होती.

# नांदुऱ्यात पोलिसांनी काढला रुटमार्च...



**जनसंचलन/नांदुरा**

रावेर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक सोमवारी १३ मे रोजी होणार असल्याने ही निवडणुक शांततेच्या वातावरणात पार पडावी. या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सुनिल कडासने, अपर पोलीस अधिक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी देवराम गवळी, यांचे मार्गदर्शनात ठाणेदार विलास पाटील, सपोनि प्रविण लिंगाडे व अन्य कर्मचाऱ्यांनी नांदुरा शहरात दुपारी पेठ मोहल्ला, कुरेशी मस्जीद, सायकल पुरा, भावसार देवी मंदीर, जामा मस्जीद, दरवार गल्ली, विठ्ठल रुखमीनी मंदीर, विदर्भ चौक, उमंग चौक, उस्मानीया चौक, मिहाणी चौक, ताज गेट, टिपु सुल्तान चौक, घासमंडी, प्राथमिक आरोग्य केन्द्र नांदुरा, छोटी मस्जीद समोरुन पोलीस स्टेशन नांदुरापर्यंत रुटमार्च काढला. सदर रुट मार्चमध्ये पोलीस स्टेशन चे ०४ अधिकारी २५ अंमलदार व ०१ एसआरपीएफ प्लाटुनचा समावेश होता.


# मलकापूर शहरात परशुराम जयंती उत्साहात साजरी

**जनसंचलन/मलकापूर**
**प्रतिनिधी**



दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्त विविध धार्मिक तथा समाज उपयोगी उपक्रमांचे आयोजन करीत शहरातील मुख्य मार्गावर भव्य शोभायात्रा काढून भगवान परशुराम जन्मोत्सव थाटात व मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर मलकापूर शहरामध्ये अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सकाळी ६ वाजता गौरक्षण येथे गोमातेचे पुजन व चारा तसेच नैवेद्य , सकाळी १०.३० वाजता पर्यावरण पूरक स्वास्थ करीता लाभदायक व मतदान जागृती करता भव्य सायकल रॅलीचे आयोजनदुपारी १२ वाजता जन्मोत्सव व महाआरती करण्यात येवून संध्याकाळी ६ वाजता लि.भो.चांडक विद्यालयाच्या प्रांगणावरून भगवान परशुराम यांची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रा टाळ, ढोल-ताशेच्या निनादात तथा पारंपारीक वेशभुषेतील महिला व पुरूष तथा युवक-युवतींच्या भव्य उपस्थितीत शिस्तबध्द पध्दतीने काढण्यात आली. तर रथामध्ये भगवान परशुराम यांची प्रतिकृतिक मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. या शोभायात्रेमध्ये काही तरुणींनी तलवारबाजी, लाठीकाठी यांसह आदींचे चित्त थरारक प्रात्यक्षिक करून उपस्थितांचे मने जिंकली. या शोभा यात्रे मध्ये आगामी काळात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मतदान करण्याकरिता जनजागृती सुद्धा करण्यात आली. तसेच सायंकाळी महाआरती करिता हजारोच्या संख्येत उपस्थित समाज बांधवांची पठ नाट्य द्वारे शत प्रतिशत मतदान करिता जागृती करण्यात आली सदर शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गांवरून भगवान परशुरामांच्या जय जयकारात निमवाडी चौक, सिनेमा रोड, बुलडाणा रोड मार्गाने चांडक विद्यालयात पोहचल्यानंतर त्याठिकाणी भगवान परशुरामजींच्या आरतीने शोभायात्रेची सांगता करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. या शोभायात्रेचे मार्गावर महिला भगिणींनी सडासारवण व रांगोळ्या काढल्या होत्या. तर ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात येवून भगवान श्री परशुरामाच्या मुर्तीचे ठिकठिकाणी पुजन करण्यात आले. त्याचप्रमाणे अनेकांकडून या शोभायात्रेत सहभागी असलेल्यांना थंडपेयाचे वितरण करण्यात आले. परशुराम यांच्या जयंतीचे औचित्य साधून क्रिकेट, रांगोळी, निबंध स्पर्धा, यांच्यासह आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शोभा यात्रेच्या सुरवातीला वेळी या स्पर्धांमध्ये यश संपादित स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले. या शोभायात्रेत मोठ्या संख्येने समाज बांधव तथा भक्तगण सहभागी झाले होते.भगवान श्री परशुरामाच्या जय जयकाराने संपूर्ण मलकापूर भगवान श्री परशुमय झाले होते. तसेच शोभायात्रेतील आकर्षक सजावट जनतेचे लक्ष वेधून घेत होती. तर यावेळी महिलांची उपस्थिती ही उल्लेखनीय अशी होती. यावेळी सामाजिक, राजकीय, सेवाभावी संस्थांचे अनेक जण प्रामुख्याने सहभागी झाले होते. सदर शोभायात्रा यशस्वीतेसाठी युवा संघटन, महिला संघटन व अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या समस्त समाज बांधवांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी पोलिस प्रशासन, नगर पालिका प्रशासन, लि.भो.चांडक विद्यालय समिती यांचे सहकार्यपूर्वक योगदान लाभले.

# अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन



**जनसंचलन/ उदयनगर**

येथून जवळचं असलेल्या वैरागड येथे श्री समर्थ गजानन महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा दिना निमित्त समस्त ग्रामस्थ यांचे वतीने १३ ते २० मे दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह तथा श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहा दरम्यान मार्गदर्शन ह.भ.प. भीमराव महाराज साठे शेगाव यांचे लाभणार असून गाथा पारायण व्यासपीठ नेतृत्व ह. भ. प. अंगद महाराज गुंड, ह. भ. प. वामन दादा नखोत तर सहयोग सेवा विदर्भभूषण विष्णू महाराज साठे यांची लाभणार आहे सप्ताहा दरम्यान अनुक्रमे ह.भ.प. गणेश महाराज हुंबाड महागाव, ह. भ. प. प्रभू महाराज राऊत मालेगाव, ह.भ.प. मुकुंद महाराज तरंगे सोलापूर, ह.भ.प. अभिजीत महाराज देशमुख बुलढाणा, ह. भ. प. संजय महाराज शास्त्री के वैजापूर, ह.भ.प. राजेश महाराज महाजन बंबाळा मध्य प्रदेश, ह. भ. प. महाराज संजय लहाने करंजी वाशिम, तर सांगते दिनी ह. भ. प. विजय महाराज खवले मोताळा यांचे सकाळी १० ते १२ वाजेदरम्यान काल्याचे कीर्तन होऊन उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे.तत्पूर्वी १९ मे रोजी श्री संत तुकाराम महाराज गाथा व महाराजांच्या प्रतिमेची संपूर्ण गावातून शोभायात्रा निघणार आहे करिता पंचक्रोशीतील भावीक भक्तांनी कीर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भरधाव रेती वाहनाच्या धडकेत गतिमंद वृध्द महिला गंभीर

जनसंचलन/ लोणार

मंठा रस्त्यावर एका ७० वर्षीय गतिमंद महिलेस भरधाव वेगाने जाणाऱ्या रेती वाहनाने उडविल्याची घटना ११ मे रोजी हॉटेल सुरज समोर घडली. सदर घटनेची माहिती मिळताच पोलीस कर्मचारी घटनास्थळावर हजर झाले होते. मराठवाड्यातील तळणी परिसरातील रेती डेपो व पूर्णा नदी पात्रातून चोरीची अवैद्यरित्या रेती वाहतूक लोणार मार्गे मेहकर, रिसोड, मालेगाव, वाशीम कडे सुरु आहे. मागील दोन महिन्यात दोन जणांचे बळी गेले. अशातच ११ मे रोजी दुपारी अंदाजे २ वाजे दरम्यान हॉटेल सुरज समोर भरघावं वेगाने जाणाऱ्या रेती वाहनाने अंदाजे ७० वर्षीय गतिमंद वृद्ध महिलेला धडक देउन रेती वाहन भरघावं वेगाने पसार झाले. घटनास्थाळवरील प्रथमदर्शी नागरिकांनी याची माहिती पोलिसांना देताच पोलीस कर्मचारी गणेश लोढे, संजय जाधव यांनी सदर वृद्ध महिलेस प्राथमिक उपचारासाठी लोणार ग्रामीण रुग्णयालयात भरती केले. हात पाय व डोक्याला गंभीर मार असल्याने पुढील उपचारासाठी बुलढाणा येथे रेफर करण्यात आले. सदर महिला गतिमंद असल्याने ती नाव व गाव सांगू शकत नाही. विशेष म्हणजे तहसीलदार अजय पिपरकर यांनी महसूल तपासणी पथकाचे ९ मे रोजी अवैद्यरित्या रेती वाहतुकीला घालण्यासाठी पायबंद नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांचे सकाळी ६ ते सायंकाळी ६ पर्यंत पथक रेती वाहने तपासणी करण्याचे आदेश काढले पण एकही कर्मचारी रस्त्यावर हजर नसल्याने तहसीलदार यांच्या आदेशाला केराची टोपली दाखविल्याचे दिसून आले. उपविभागीय अधिकारी यांचे भरारी पथकही रात्री येते पण दिवसा गरीबाचे बळी जात असतील तर अशा पथकाचा फायदा काय. ७० वर्षीय वृद्धमहिला ही मतिमंद आहे तिचे नाव नाही गाव नाही मग शहरातील सामाजिक संघटना त्या महिलेला न्याय मिळून देण्यासाठी पुढे येणार का असेच निष्पाप बळी जाऊ देणार. तसेच अवैद्य गौण खनिज रोखण्यासाठी ज्या तपासणी पथकातील कर्मचारी यांचे तहसीलदार यांनी आदेश काढून नेमणूक केली त्यानि या आदेशाला केराची टोपली दाखविली त्यावर कारवाई होणार का जिल्हाधिकारी, एसडीओ याकडे जातीने लक्ष घालणार का याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागूनआहे. एवढे मात्र खरे.




# विद्युत डीपीतील ४०० लिटर ऑईल लंपास...

जनसंचलन/ खामगाव

महावितरण कंपनीच्या विद्युत डीपीतील ४०० लिटर ऑईल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना ११ मे रोजी उघडकीस आली आहे. याबाबत महावितरणच्या वतीने शिवाजीनगर पोस्टेला देण्यात आलेला तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सजनपूरी शिवारातील श्री कल्याणजी ऑइल इंडस्ट्रीज नजीक महावितरण ची विद्युत डीपी आहे. या वाल खालील वालची सेफ्टी कॅप सोडून अज्ञात चोरट्याने ४०० लिटर ऑइल किंमत चाळीस हजार रुपयांचे लंपास केले. अशी तक्रार महावितरणचे सहाय्यक अभियंता सचिन मधुकर बावनकर यांनी शिवाजीनगर पोस्टेला दिली आहे. त्यामुळे शिवाजीनगर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध कलम १३६ नुसार गुन्हा दाखल केला आहे. याबाबत अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मंदार पुरी करीत आहे.

# वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील ३ गंभीर

जनसंचलन/ खामगाव

मोटर सायकलला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने तिघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना ११ मे रोजी पहाटे ५. ३० वाजेदरम्यान नांदुरा खामगाव रोडवर आमसरी जवळ घडली. देवेंद्र आसाराम पारेला, सुनिल मदन सिसोदिया, प्रकाश बारेला रा. मध्यप्रदेश हे तिघेजण मोटरसायकल क्र. एमपी ६८ झेडए २५१८ ने जात असतांना उपरोक्त ठिकाणी त्यांच्या मोटार सायकलला अज्ञात वाहनाने धडक दिली. यामुळे दुचाकी डिव्हायडरवर जाऊन धडकली. या अपघातात देवेंद्र आसाराम पारेला, सुनिल मदन सिसोदिया, प्रकाश बारेला राहणार मध्यप्रदेश है गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच ओम साई फाउंडेशनची रुग्णवाहिका घेवून विलास निंबोळकर, कृष्णा नालट, अचिन फेरण, सागर पांडे, अभिजीत टिकार च जलंब पोलीस स्टेशनचे सहायक फौजदार दिनकर तिडके हे घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी जखमींना उपचारासाठी रुग्णालयात पाठविले.

# नव्या शैक्षणिक सत्रासाठी शिक्षक विद्यार्थ्यांच्या शोधात निघाले !

## गावागावांत मारताहेत चकरा पालकांना भेटून प्रवेशासाठी करत आहेत विनवणी

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील अनेक जि. प. शाळांनी कात टाकली असली तरी काही शाळा ओस पडण्याच्या मार्गावर आहेत. अशा शाळांसाठी शिक्षक आता पहिल्या वर्गात प्रवेश घेण्याचे वय झालेल्या विद्यार्थ्यांच्या शोधात असून काही खासगी शाळांतील शिक्षक त्यासाठी फिरत असल्याचे चित्र आहे. जिल्हा परिषद शाळेचा निकाल मे महिन्याच्या १ तारखेला लागला आहे. या शाळेतील विद्यार्थी एका वर्गातून दुसऱ्या वरच्या वर्गात गेलेले आहेत. त्यामुळे खालचा वर्ग रिकामा झालेला आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या शोधात शिक्षकांची भटकंती सुरू झाल्याचे चित्र आहे. आपल्या शाळेतील पहिल्या वर्गामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा प्रवेश व्हावा, या हेतूने शिक्षक हे गावोगाव फिरून विद्यार्थ्यांचा शोध घेताना आपल्याला पाहायला



मिळत आहेत. जिल्हा परिषदेच्याच नव्हे तर काही खासगी शाळांचेही शिक्षक यासाठी फिरत असल्याचे चित्र आहे. अनेक जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांची पटसंख्या खूप कमी झाली आहे. आपल्या विद्यार्थ्यांची संख्या वाढावी, या हेतूने शिक्षक विद्यार्थी शोधत आहेत. यामध्ये पहिलीच्या वर्गात नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी शिक्षक मुलांच्या पालकांच्या घरोघरी जाऊन पालकांना समजावून शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रोत्साहित करत आहेत. ग्रामीण भागातील पालकवर्ग मुलांना कॉन्व्हेंटमध्ये पाठवत आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळा ओस पडल्याच्या स्थितीत दिसत आहेत. मात्र सद्य:स्थितीत जिल्हा परिषद शाळेनेसुद्धा आपला शिक्षण देण्याचा मार्ग वळविल्याने आता त्या शाळेमध्ये मुलांसह पालकांना प्रोत्साहित करण्यासाठी शिक्षकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. जि. प. शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या पटसंख्येनुसार शिक्षकांची भरती असल्याने आता त्या शाळेतील शाळा-पालक समिती विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी प्रयत्नरत आहे.

# महिलेचा मृतदेह आढळला

जनसंचलन/मोताळा

तालुक्यातील चिंचपूर शाखा येथे एका ७७वर्षीय वेडसर महिलेचा मृतदेह १० मे ला आढळला. मृतक महिलेचे नाव केसरबाई सुरडकर असे आहे. याप्रकरणी बोराखेडी पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे. चिंचपूर येथील निंबाजी सुरडकर यांनी बोराखेडी पोस्टे. ला दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, त्यांची वयोवृध्द आई केसरबाई सुरडकर यांच्या डोक्यात फरक पडला होता. त्या इकडे तिकडे फिरत असायच्या, ६ मे रोजी घरी कोणाला काही न सांगता त्या निघून गेली होती. त्यांचे प्रेत १० मे रोजी सकाळी ७ वाजेच्या दरम्यान आढळून आल्याच्या फिर्यादीवरुन बोराखेडी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# रेतीचे अवैध उत्खनन,जेसीबी जप्त

जनसंचलन/ डिग्रस

देऊळगाव राजा तालुक्यातील डिग्रस बुद्रुक येथे रेतीचे अवैध उत्खनन करत असलेला एक जेसीबी महसूल पथकाने जप्त केला आहे. अंढेरा पोलिस ठाण्यात तो सध्या लावण्यात आला आहे. ६ मे रोजी सायंकाळी डिग्रस येथील खडकपूर्णा नदीतून रेतीचे अवैधरित्या उत्खनन सुरू असल्याची माहिती महसूल विभागाच्या पथकाला मिळाली होती. त्यानुषंगाने पथकाने तेथे जाऊन पाहणी केली. सोबतच जेसीबी चालकाकडे अनुषंगिक परवाना मागितला. परंतु संबंधितांकडे तो मिळून आला नाही. प्रकरणी ही कारवाई करण्यात आली. तहसीलदार वैशाली डोंगरजाळ, नायब तहसीलदार आस्मा मुजावर, महसूल सहायक शिवानंद आंधळे, प्रशांत वाघ व अन्य कर्मचारी कारवाईदरम्यान उपस्थित होते.



# संदीपान भुमरेंना भाजपचा मोठा झटका?

## जलील निवडून येणार असेल तर खैरेंना मदत?




**वृत्तसंस्था/संभाजीनगर**

राज्यातील लोकसभेच्या ४ टप्पातील मतदानाला काही दिवस शिल्लक असताना भाजपच्या अंतर्गत भेटीगाठी वाढल्या आहेत. संभाजीनगर मध्ये लोकसभा लढवण्यासाठी भाजप इच्छुक होते पण शिंदे गटाच्या आक्रमकते समोर भाजपला झुकावे लागले होते. आणि महायुतीचे उमेदवार म्हणून शिंदे गटाच्या मंत्री संदीपान भुमरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. दुसरीकडे ठाकरे गटाकडून चंद्रकांत खैरे, पक्षाकडून विद्यमान खासदार इम्तियाज जलील निवडणुकीच्या मैदानात आहे. वरकरणी ही निवडणूक तिरंगी वाटत असली तरी प्रमुख लढत ठाकरे गट विरुद्ध शिंदे गट यांच्यात रंगणार आहे. असे असले तरी भुमरे यांचे शहरात आणि गावखेड्यात प्रभाव कमी आहे. पण भाजपचा पारंपरिक मतदार असलेला समाजामुळे भुमरे यांना मोठे मते मिळतील अशी शक्यता नाकारता येत नाही. परंतु, २०१९ च्या लोकसभेत चंद्रकांत खैरे विरुद्ध इम्तियाज जलील विरुद्ध हर्षवर्धन जाधव यांच्यात लढत झाली, त्यात जलील विजयी झाले होते. यावेळी तसे होईल याची भीती भाजपच्या नेत्यांकडून व्यक्त होत आहे. भाजपच्या अंतर्गत सर्व्हेत संदीपान भुमरे हे पराभूत होतील अशी माहिती होती, तरी देखील शिंदे गटाकडून भुमरे यांना उमेदवारी देण्यात आली. भुमरे विरुद्ध खैरे यांच्या भांडणात जलील निवडून येतील अशी भीती भाजपच्या स्थानिक नेत्यांना वाटते. जलील निवडून न यावेत म्हणून सर्वोतपरी भाजपकडून प्रयत्न होत आहेत. जलील यांना पराभूत करायचे असेल तर खैरे यांना गुप्त मदत भाजपकडून होण्याची शक्यता आहे. संदीपान भुमरे हे मराठा असल्याने आणि भाजप नेते भागवत कराड यांना लोकसभेतील उमेदवारी न दिल्याने समाज नाराज आहे. दुसरीकडे विनोद पाटील खैरे यांना मदत करत असल्याची मोठी चर्चा आहे. त्यामुळे भुमरे यांचा विजयी मार्ग कठीण आहे.

# पुरेसा ओलावा असल्याशिवाय पेरणी करू नये कृषि विभागाचे आवाहन




**जनसंचलन/बुलढाणा**

शेतकऱ्यांनी खरीप हंगाम सन २०२४ मध्ये जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याशिवाय सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कपाशी बियाण्याची पेरणी करू नये, असे आवाहन कृषि विभागातर्फे करण्यात आले आहे. शेत जमिनीची ओल ४ ते ६ इंच किंवा १०० मीमी पाऊस झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी कोणत्याही बियाण्याची पेरणी करू नये, जमिनीमध्ये पुरेसा ओलावा नसताना पेरणीची घाई केल्यास जमिनीतील उष्णतेमुळे पेरलेले बियाण्यांचे अंकुरण होणार नाही किंवा अंकुरण होऊन जळण्याची भिती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच शेतकऱ्यांचा वेळ व आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतकऱ्यांनी आर्थिक नुकसान होऊ नये, यासाठी कृषी विभागाच्या संदेशानुसार १०० मीमी पाऊस पडल्यानंतरच किंवा जमिनीची ओल ४ ते ६ इंच किंवा जमिनीमधील उष्णता जाईपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये. शेतकऱ्यांनी कोणत्याही पिकाची धूळपेरणी करू नये. खरीप हंगामातील सर्व पिके जमिनीत पुरेशी ओल म्हणजेच जमीन ४ ते ६ इंच ओल झाल्याची खात्री करूनच पेरणी करावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# पुण्यात आज मतदान शिरुर, मावळसह राज्यात ११,तर देशात ९६ जागांवर मतदान



**वृत्तसंस्था/ पुणे**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात पुणे लोकसभा मतदारसंघासोबत जिल्ह्यातील शिरूर आणि मावळ लोकसभा मतदारसंघासाठी आज, सोमवारी (१३ मे) मतदान होणार आहे. सकाळी सात ते सायंकाळी सात या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार असून, जिल्ह्यातील उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रांत बंदिस्त होणार आहे. पुणे लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे मुरलीधर मोहोळ आणि काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांच्यात लढत होत आहे. याशिवाय वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मोरे आणि एमआयएमकडून अनिस सुंडके रिंगणात आहेत. ही लढत चौरंगी असली, तरी ती प्रत्यक्षात मोहोळ विरुद्ध धंगेकर अशीच असल्याने कमालीची चुरस निर्माण झाली आहे.शिरूर लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे डॉ. अमोल कोल्हे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यात थेट लढत होत आहे. वंचित बहुजन आघाडीकडून प्राचार्य डॉ. आफताब शेख यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पुण्याप्रमाणे येथेही दोन प्रमुख उमेदवारांमध्येच थेट लढत होत आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. त्यांच्यासमोर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संजोग वाघेरे यांनी आव्हान निर्माण केले आहे.पुणे, शिरूर आणि मावळची निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडीसाठी प्रतिष्ठेची झाली आहे. पुणे आणि मावळ ही जागा राखण्याचे आव्हान महायुतीपुढे आहे; तर शिरूरची जागा राखण्याचे आव्हान शरद पवार यांच्या राष्ट्रवादीपुढे आहे. शिरूरची लढत बारामतीप्रमाणे ङ्गसाहेब विरुद्ध दादाफ अशी झाली आहे. बारामती येथे सात मे रोजी मतदान झाले आहे. पुणे, शिरूर आणि मावळ येथील मतदानासाठी जिल्हा प्रशासन आणि निवडणूक आयोगाने सर्व तयारी केली आहे. संवेदनशील मतदान केंद्रांवर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

# जागतिक परिचारिका दिन मोठ्या उत्साहात साजरा...






**जनसंचलन/बुलढाणा**

दिनांक १२ मे २०२४ रोजी राजे मंगल कार्यालय बुलढाणा येथे जागतिक परिचारिका दिन सोहळा म्हणजेच आदर परिचारिका फ्लोरेन्स नाईटींगेल यांचा जन्मदिवस कार्यक्रम जिल्हा परिषद आरोग्य सेवेतील सर्व परिचारिका भगिनी यांच्या वतीने आयोजित करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रीमती डॉ. विजयाताई काकडे या होत्या. तर प्रमुख उपस्थिती श्रीमती. सपना मस्के, श्रीमती.शोभा लवंगे ,श्रीमती. अरुणा हरसाड, श्रीमती. लता गुजर श्रीमती. शितल साखळीकर या होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी सर्व परिचारिकांनी मेणबत्ती पेटवून प्लोरेन्स नाइटिंगेल यांचा जन्मदिवस साजरा केला. त्यांच्या कार्याविषयी यथोचित माहिती भाषणद्वारे श्रोते यांनी मांडली व त्यांचा कार्याचा गौरव करण्यात आला. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या उत्तम योगदान देणाऱ्या भगिनी यांचा ट्रॉफी व गुलाब फूल देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती. स्वाती शेंद्रे यांनी उत्तम रित्या केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी श्रीमती. प्रभा माळे, श्रीमती. कविता खाडे, श्रीमती. प्राची राखोंडे,श्रीमती.लताताई गुजर ,श्रीमती. अरुणा जाधव, श्रीमती. सुनिता वैद्य, श्रीमती. अनुराधा पोटदुखे, मीरा कोगदे यांनी परिश्रम घेतले यावेळी जिल्ह्यातील सर्व परिचारिका भगिनी व आरोग्य कर्मचारी पतसंस्था संचालक व जागतिक परिचारिका दिन उत्सव समितीचे सदस्य या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.

# यंदा ५८ दिवस अभ्यासाला सुटी...

**जनसंचलन/ खामगाव**

शिक्षण विभागाकडून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये उन्हाळी सुटीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. यानुसार जिल्ह्यातील प्राथमिक शाळांना गुरुवार, २ मे पासून तर माध्यमिक शाळेच्या च्या वर्गांना शनिवार ४ मेपासून उन्हाळी सुट्या देण्यात आल्या असून १ जुलैपासून नवीन शैक्षणिक सत्र सुरू करण्यात येईल. त्यामुळे सरासरी ५७ ते ५८ दिवसांच्या सुट्यांचा आनंद विद्यार्थ्यांना घेता येणार आहे. राज्यातील राज्य मंडळाच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना २ मे पासून सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या पृष्ठभूमीवर अकोला शिक्षण विभागाच्या वतीने निवेदन जाहीर करण्यात आले आहे. या निवेदनानुसार यंदा उन्हाळी सुट्या जवळपास ५८ दिवसांच्या राहणार आहेत.